# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

## महाविद्यालयीन शाखा

छत्रपति शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपुर–४४० ००१ दुरध्वनी क्रमांक २५२९९३२


क्र.म.वि./ ७३९५ 　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　दिनांक :२२/१२/२०१४

प्रति,

अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,
सर्व संलग्नित व्यावसायीक अभ्यासक्रमांचे महाविद्यालय,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

विषय:– संस्थांनी त्यांच्या संकेतस्थळावर स्थानिय चौकशी समितीचा अहवाल व संलग्निकरणाचे पत्र प्रकाशित करण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्यातील व्यावसायीक अभ्यासक्रमांचे प्रवेश करण्यापूर्वी विद्यापीठाचे संलग्निकरण व तद्‌अनुषंगिक विषयावर चर्चा करण्याकरिता सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली संचालनालयातील बैठक दालनात शुक्रवार दिनांक ५.१२.२०१४ रोजी बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीत ठरल्याप्रमाणे तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा–या केंद्रीभुत प्रवेशप्रक्रियेकरिता महाविद्यालयांनी विद्यापीठाव्द्रारे निरंतर संलग्निकरणाकरिता गठीत स्थानिय चौकशी समितीचा अहवाल तसेच विद्यापीठाव्दारे प्रदान करण्यात आलेले संलग्निकरण पत्राची प्रत महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करणे बंधनकारक असुन त्याची एक प्रत तंत्रशिक्षण संचालनालयास देखिल अग्रेषित करावयाची आहे.

त्याअनुषंगाने सर्व व्यावसायीक अभ्यासक्रम चालविणा–या महाविद्यालयांना कळविण्यात येते की, स्थानिय चौकशी समितीचा अहवाल व संलग्निकरण पत्र प्रवेशप्रक्रिया सुरू होण्यापुर्वी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करावी, तसेच त्याची हार्ड कॉपी तंत्रशिक्षण संचालनालयास अग्रेषित करावी. ज्या संस्थांच्या संकेतस्थळी स्थानिय चौकशी समितीचा अहवाल व संलग्निकरणाचे पत्र प्रकाशित केले नसेल अशा संस्थांचा संचालनालयामार्फत राबविण्यात येणा–या केंद्रीभुत प्रवेशप्रक्रियेकरिता विचार केला जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे.

(डॉ. रमण मदने)
उपकुलसचिव(म.वि.)
(अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

प्रतिलिपी:–

१. सहसंचालक (तंत्र शिक्षण), नागपूर विभाग, सदर नागपूर